राष्ट्रपिता महात्मा गांधीजी की १५० वी जन्मवर्ष गाठ के उपलक्ष में
उनके कार्य के अवलोकनार्थ संपादित ग्रंथ




# महात्मा गांधी
# जीवन, कार्य एवं विचार

संपादक
डॉ सूर्यकांत कापशीकर
इतिहास विभागप्रमुख
यशोदा गर्ल्स आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज
स्नेह नगर, नागपूर ४४००१५

KAPSHIKAR
PUBLICATIONS

महात्मा गांधी: जीवन, कार्य एवं विचार
संपादक: डॉ सूर्यकांत कापशीकर
Mahatma Gandhi: Jivan, Karya evam Vichar
Editor: Dr Suryakant Kapshikar




सौजन्य:
डॉ धनराज शेटे
प्राचार्य
यशोदा गर्ल्स आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज
स्नेह नगर, नागपूर ४४००१५

सर्वाधिकार:
यशोदा गर्ल्स आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज
स्नेह नगर, नागपूर ४४००१५

प्रकाशक:
तृप्ती सुर्यकांत कापशीकर
कापशीकर प्रकाशन
बेलतरोडी नागपूर ४४००३७

प्रथम आवृत्ती:
३० जानेवारी २०२०

मुद्रक: दिनेश ग्राफिक्स नागपूर

किंमत:
४५० रुपये

ISBN: 978-81-943484-1-2

**Copyright©**
All rights reserved.
No part of this publication may be reproduced stored in a retrieval system or transmitted in any form or by any means electronic, mechanical, photocopying, recording or otherwise with the prior permission of the Editor.
The papers included in this publication have been directly reproduced with minimum editorial intervention, from the files sent by the respective authors. The responsibility for facts states, opinions,expressed or conclusion reached and plagiarism if any, in this book is entirely that of the authors/contributors.
The Editor, Advisory Committee, Editorial Board Members & Peer Reviewed Committee Printer bears no responsibility for them; whatsoever.
In case of any dispute all legal matter are to be settle under Nagpur Jurisdiction only

# अनुक्रमणिका

प्रस्तावना
संपादकीय

| | | |
|---|---|---|
| 1 | Resurrection of Ahimsa.<br>Muna Khayal Khattak | 1 |
| 2 | Gandhian Economic Philosophy: Utopian Dream or Pragmatic Inclusiveness?<br>Dr. Latha Venkataraman | 11 |
| 3 | Mahatma Gandhi: Special Reference to Urdu Poetry<br>Azhar Abrar | 22 |
| 4 | Socio-Political Thought of Mahatma Gandhi<br>Dr. Sharad P. Sambare | 26 |
| 5 | Mahatma Gandhi and his idea of 'Accommodative Nation'<br>Dr. (Mrs) Anjali Gaidhane | 38 |
| 6 | Nai Talim: Gandhian Education System<br>Dr. Kirti B. Sadar | 45 |
| 7 | Mahatma Gandhi's Vision of Model Village<br>Vijay P. Rahangdale | 51 |
| 8 | Mahatma Gandhi's Concept of Cleanlines<br>Dr. B. D. Katekhaye | 63 |
| 9 | Non Violence: An Ultimate Religion of the World with Special Reference to Mahatma Gandhi<br>Anilkumar Nanakram Daryani | 69 |
| 10 | Rural immersion: Gandhiji's vision<br>Dr. Renu Bayaskar | 76 |
| 11 | Exploring the persona of Mahatma Gandhi as a True Peacemaker using his exclusive weapon of Satyagraha<br>Dr. Ms. Ghizala. R. Hashmi | 83 |
| 12 | Mahatma Gandhi: A Statesman-Saint<br>Dr. Renuka L. Roy | 91 |
| 13 | Educational Aspects of Mahatma Gandhi towards Building Knowledge Society<br>Dr Sudharkar Thool | 100 |
| 14 | Mahatma Gandhi: An Apostle Of Truth, Non-Violence And Tolerance<br>Dr. K. J. Sibi | 106 |
| 15 | महात्मा गांधीजी और सत्याग्रह<br>डॉ. अनुभूति सेंडीमन | 114 |
| 16 | महात्मा गांधीजी के राजनीतिक विचार<br>श्रीमती सीमा मिश्रा | 119 |

| | | |
|---|---|---|
| 59 | महात्मा गांधी यांचे दारूबंदी व व्यसनमुक्तीविषयक विचार<br>शिवाजी सुभाष खिराडे | 381 |
| 60 | महात्मा गांधीजीच्या नेतृत्वातील स्वातंत्र चळवळीत अमरावतीतील स्त्रीयांचा सहभाग<br>डॉ. वैशाली भाकरे | 386 |
| 61 | राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांचा ऋणानुबंध<br>प्रा. डॉ. भारत विठोबा नखाते | 393 |
| 62 | महात्मा गांधी यांचे स्वदेशी व खादी विषयक विचार<br>प्रा. डॉ. नितीन उल्हासराव सराफ | 402 |
| 63 | महात्मा गांधीच्या सविनय कायदेभंग चळवळीचा विदर्भावर झालेला परिणाम<br>प्रा. डॉ. एन. टी. वानखडे | 406 |
| 64 | महात्मा गांधींची शिक्षण योजना<br>प्रा. डॉ. चंद्रशेखर क्षिरसागर | 409 |
| 65 | महात्मा गांधींच्या रामराज्यासंबंधी विचारांचे ऐतिहासिक अध्ययन<br>प्रा. डॉ. प्रकाश पवार | 414 |
| 66 | महात्मा गांधी- ग्राम स्वराज संकल्पना आणि सद्यस्थिती<br>डॉ. ओमप्रकाश बोबडे | 419 |
| 67 | महात्मा गांधीजींची विचारसरणी<br>प्रा.ए. एम. काळपांडे. | 424 |
| 68 | वर्धा जिल्ह्यातील महात्मा गांधी प्रणीत अस्पृश्यता निवारण चळवळ<br>डॉ. प्रियराज महेशकर | 428 |
| 69 | गांधी-आंबेडकर यांच्यात झालेल्या पुणे करारामध्ये महारेतरांचे योगदान<br>डॉ सूर्यकांत महादेवराव कापशीकर | 432 |
| 70 | महात्मा गांधी आणि सत्याग्रह<br>प्रा. किशोर शेषराव चौरे | 438 |
| 71 | गांधीवाद आणि मराठी साहित्य<br>प्रा. डॉ. अनिता देशमुख | 446 |
| 72 | १९२० चे नागपूर कॉंग्रेस अधिवेशन आणि महात्मा गांधी<br>प्रा. डॉ. श्रीकांत म. सोनटक्के | 451 |
| 73 | महात्मा गांधींची पत्रकारिता<br>प्रा. दीपक महाजन | 457 |
| | संदर्भसूची | 463 |

# वर्धा जिल्ह्यातील महात्मा गांधी प्रणीत अस्पृश्यता निवारण चळवळ

डॉ. प्रियराज महेशकर सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख
प्रियदर्शनी महिला महाविद्यालय, वर्धा

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली अस्पृश्योध्दार चळवळ प्रभावीपणे उभी झाल्यामुळे अस्पृश्यांच्या प्रश्नांकडे अधिक लक्ष देण्याची गरज महात्मा गांधीना वाटली. त्यातूनच ते वास्तव्यास असलेल्या वर्धा परिसरात रचनात्मक कार्यक्रमातील अस्पृश्यता निवारणांचे प्रयोग सर्वप्रथम व व्यापक प्रमाणात झाले. अस्पृश्यांसाठी खुले झालेले वर्धा येथील लक्ष्मीनारायण मंदीर हे भारतात पहिले ठरले. सत्याग्रहींनी वर्धा जिल्ह्यातील गावागावांत फिरून तेथील मंदीरे, विहीरी अस्पृश्यांसाठी खुल्या केल्या. स्वत: गांधीजी अस्पृश्यांची वस्ती असलेल्या सेगांव सेवाग्राम येथे राहण्यास आले. त्यांच्या आश्रमातील बहुतेक सर्व कामे अस्पृश्यांना देण्यात आली. महात्मा गांधीच्या वास्तव्यामुळे व त्यांच्या अस्पृश्योंध्दार कार्यक्रमांमुळे वर्धा परिसरातील स्पृश्य हिंदूंच्या मनांतील अस्पृश्यविरोधी भावना सौम्य झालीच शिवाय संपूर्ण भारतातील गांधीवादी अस्पृश्यता निवारण चळवळीस दिशा व गती मिळाली. अखिल भारतीय स्तरावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या उच्चविद्याविभुषित दलित नेतृत्वाचा उदय होऊन त्यांनी कॉंग्रेस व महात्मा गांधी यांच्या पुढे मोठे आव्हान उभे केले. त्यामुळे महात्मा गांधीना स्वत: अस्पृश्यांच्या प्रश्नांकडे अधिक लक्ष देण्याची निकड वाटू लागली होती. वस्तुत: गांधीजीच्या सत्याग्रह कार्यक्रमातील रचनात्मक कार्यक्रमांमध्ये अस्पृश्यता निवारण कार्यक्रमाचा समावेश हा १९२० पासुनच करण्यात आलेला होता. पण डॉ. आंबेडकरांच्या उदयानंतर महात्मा गांधीनी आपले सारे लक्ष रचनात्मक कार्यक्रमांवर त्यातही अस्पृश्योध्दार कार्यक्रमांकडे देण्यास प्रारंभ केला. त्यासुमारास महात्मा गांधी हे तत्कालिन मध्य प्रांतातील वर्धा परिसरात वास्तव्यास असल्यामुळे त्यांच्या अस्पृश्यता निवारण कार्यक्रमांचे प्रयोग वर्धा जिल्हा परिसरात सर्वप्रथम व व्यापक प्रमाणात झाल्याचे दिसते.

जमनालाल बजाज यांच्या पुढाकारातुन १९२१ मध्ये वर्धेत विनोबा भावे यांच्या मार्गदर्शनाखाली सत्याग्रह आश्रमाची स्थापना करण्यात आली होती. या आश्रमाच्या वतीने १९२४ पासुन सत्याग्रहाव्यतिरिक्त अस्पृश्यता निवारणाचा एक कार्यक्रम रचनात्मक कार्यक्रमाचा भाग म्हणुन हाती घेण्यात

आला होता. आश्रमातील सत्याग्रही वर्धा परिसरातील गावोगावी जाऊन अस्पृश्यांना आत्मबलाची शिकवण देत तसेच स्पृश्य सवर्णांना अस्पृश्यता हे परमेश्वरांच्या नावाने केलेले पाप आहे असे पटवून देण्याचा प्रयत्न करीत असत.[१] सत्याग्रही आश्रमाच्या कार्यकर्त्यांमुळे अस्पृश्यतेच्या प्रश्नासंदर्भात जिल्ह्यात वातावरण निर्मिती होण्यास मोठी मदत झाली. यानुसार १९ जुलै १९२८ रोजी जमनालाल बजाज यांच्या पुढाकारातून वर्धा शहरातील प्रसिद्ध लक्ष्मीनारायण मंदिर अस्पृश्यांना खुले करण्यात आले. यावेळी सुमारे १२०० अस्पृश्यांसह विनोबा भावेंनी मंदिरात प्रवेश केला होता. सनातनी व कर्मठ विचारसरणीचे प्राबल्य असलेल्या त्याकाळी अस्पृश्यांना मंदिर प्रवेश ही एक मोठीच क्रांतीकारी घटना होती. याच कृतीचे भारतात पुढे अनेक ठिकाणी अनुकरण करण्यात आले होते[२] कारण महात्मा गांधींच्या कार्यक्रमानुसार त्यांच्या सत्याग्रहींनी खुले केलेले वर्धा शहरातील लक्ष्मीनारायण मंदीर हे अस्पृश्यासाठी खुले झालेले भारतातील पहिले मंदिर होते.

लक्ष्मीनारायण मंदिर अस्पृश्यांसाठी खुले केल्यानंतर वर्धा शहरातील राममंदिर व इतर दोन मंदिरे जमनालाल बजाज यांच्या पुढाकाराने खुली करण्यात आली. हिंगणघाट मध्येही सप्टेंबर १९३२ मध्ये एक मंदिर खुले करण्यात आले. जानेवारी १९३४ मध्ये सुरगाव, सेलू, पवनार, नालवाडी, सिंदी येथील मंदिरे अस्पृश्यांसाठी खुली करण्यात आली. मीराबेन ;मॅडिलीन स्लेडद्ध यांच्या पुढाकारातून खरांगणा गावासभोवतालच्या पाच विहिरी अस्पृश्यांसाठी खुल्या करण्यात आल्या. नागपुरातील ६५ विद्यार्थ्यांनी वर्धा जिल्ह्यातील १२५ गावात फिरुन अस्पृश्योध्दारासंदर्भात काम करुन ३२ मंदिरे, ११५ विहिरी तसेच देवळी नगरपालिकेच्या सर्व विहिरी अस्पृश्यांसाठी खुल्या केल्याची माहिती मिळते. आर्वी जवळील धनोडी या गावच्या नरकेसरी अभ्यंकरानी आपल्या देवघरात अस्पृश्यांना प्रवेश दिला, गावातील स्पृश्य लोकांसमवेत अस्पृश्यांना सहभोजन दिले तसेच आपल्या विहिरीतून पाणी काढण्याची परवानगी दिली होती. त्यामुळे अभ्यंकर घराण्याला सनातन्यांनी बहिष्कृत केले होते. आक्टोंबर १९३४ मध्ये महात्मा गांधींनी कॉंग्रेसचा राजीनामा देऊन आपले संपुर्ण लक्ष विधायक आणि रचनात्मक कार्याकडे देण्याचा निश्चय केला. या कार्याची उभारणी खेड्यांमधुन होणे गरजेचे असल्याचे गांधीजीचे मत असल्यामुळे त्यांनी स्वत:ही खेडेगावातच राहून कार्य करण्याचा निश्चय केला. त्यासाठी त्यांनी वर्धेच्या जवळील प्रामुख्याने अस्पृश्यांची वस्ती असलेले 'सेगाव',आजचे सेवाग्राम निवडले. सेगाव येथे राहायला जाण्यापुर्वीच गांधीजींनी सेगाव वासीयांपुढे आपला मनोदय व्यक्त केला होता. त्यातुन त्यांचा अस्पृश्यता

निवारणा संदर्भात काम करण्याचा विचार व्यक्त झाला होता. गावकऱ्यांना गांधीजी म्हणाले होते की,

"मी स्वत:स तुमच्यावर लादून घेणार नाही. तुमची सेवा करण्याव्यतिरिक्त कोणत्याही हेतुने मी येथे येत नाही. पुष्कळ ठिकाणी मी व माझ्या कार्यक्रमांची लोकांना भीती वाटते या भीतीमागील एक कारण असे आहे की,अस्पृश्यता निवारण हे माझे जीवनकार्य मानलेले आहे. तुम्हास मीराबेन कडुन समजले असेलच की, मी अस्पृश्यतेचा पुर्ण त्याग केलेला असुन सर्व धर्मांचे व जातीचे लोक समान लेखतो. तसेच जन्मावर आधारीत भेदभाव मी अनैतिक मानतो. परंतु मला सांगायचे आहे की,मी माझे विचार तुमच्यावर लादणार नाही. माझ्या उदाहरणावरून मतपरिवर्तनाद्वारे मी ते साध्य करीन."[६] महात्मा गांधींचे वास्तव्य सेवाग्रामला झाल्यानंतर सर्व जातीय तरुणांनी एकत्र येऊन एक स्पेशल क्लब स्थापन केला. या क्लबच्या वतीने गणपती उत्सव आयोजित करण्यात येऊन त्या उत्सवाचे उद्घाटन अस्पृश्य जातीतील बंकीम ताकसांडे यांच्या हस्ते केले गेले. सेवाग्राममध्ये अस्पृश्य लोक हे विठ्ठलाची परंपरेने आराधना करीत तर स्पृश्य लोक दत्तात्र्याची पुजाअर्चा करीत होते. अस्पृश्यांना दत्त मंदिरात प्रवेश नव्हता. हा भेद दुर करण्यासाठी क्लबने पुढाकार घेतला. त्यांनी अस्पृश्यांच्या विठ्ठल मंदिरात लिंबाशा मांगाला तर दत्त मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश देऊन जातीभेदाच्या भींती पाडण्याचा प्रयत्न केला.[७]

महात्मा गांधींनी सेवाग्राम आश्रमातील बऱ्याच कामकाजात अस्पृश्य व्यक्तींना जाणीवपुर्वक समावून घेतले होते. लुई फिशर या अमेरिकन पत्रकाराने जुन १९४२ मध्ये आश्रमाला भेट दिली. आश्रमातील अस्पृश्यांच्या समावेशाबाबत त्याने लिहले होते की, आश्रमातील बहुतेक सर्व कामे अस्पृश्यांच्या हातून केली जातात आणि जो हिंदु या आश्रमात येईल त्यालाही अस्पृश्यांच्या हातचेच अन्न खाण्याचे आणि त्यांच्या सानिध्यात राहण्याचे बंधन आहे.[८] १९३५ साली येवला येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्म त्यागाची ऐतिहासिक घोषणा केली. या घोषणेमुळे देशभर मोठीच चळवळ निर्माण झाली होती. या पार्श्वभुमीवर जमनालाल बजाज आणि सेठ वालचंद हिराचंद यांनी पुढाकार घेऊन डॉ. आंबेडकर व महात्मा गांधी यांची भेट घडवुन आणली. १ मे १९३६ रोजी डॉ. आंबेडकर व महात्मा गांधी यांची सेवाग्राम आश्रमात भेट झाली. यावेळी उभयंतामध्ये अस्पृश्यांच्या प्रश्नांवर चर्चा झाली. डॉ. आबेंडकरानी सेवाग्राम आश्रमात गावातील अस्पृश्यांसोबतही चर्चा केली. वर्धेजवळच्या नालवाडी या गावासही त्यांनी भेट देऊन समाजबांधवाना मार्गदर्शन केले. वर्धेतील अस्पृश्य

समाजाचे कार्यकर्ते पुरुषोत्तम खापर्डे, शंकरराव सोणवणे, गोमाजी टेंभरे यांनी आंबेडकरांची भेट घेऊन धर्मांतरांबद्दल चर्चा केली.[१]

थोडक्यात, संपूर्ण भारतात अस्पृश्यांवर विविध प्रकारचे अन्याय व अत्याचार केले जात असत. वर्धा जिल्ह्याचा परिसरही त्याला अपवाद नव्हता मात्र महात्मा गांधीच्या वर्धा जिल्हयातील वास्तव्यामुळे वर्धा जिल्हयातुनच सर्वप्रथम संपूर्ण भारतातील अस्पृश्यता निवारण कार्यक्रमांचे प्रयोग केले जाऊ लागले. त्यामुळे आपोआपच जिल्हयातील स्पृश्य हिंदूच्या मनातील अस्पृश्यविरोधी भावना सौम्य होण्यास मदत झालीच शिवाय भारतात अस्पृश्यता विरोधी आंदोलनास दिशा व गती मिळाली.

❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

16 गांधी साहित्य मेरे समकालीन– प्रकाशक, सस्ता साहित्य मंडळ, नई दिल्ली –११०००१

## 67 महात्मा गांधीजींची विचारसरणी

प्रा.ए. एम. काळपांडे

1 विद्याधर महाजन, आधुनिक भारत का इतिहास, अकरावी आवृत्ती, 1993, एस चंद ॲण्ड कंपनी, नई दिल्ली, पृ .601

2 गांधी रिसर्च फाउण्डेशन, खोज गांधीजी की, जलगाव मासिक पत्रिका, ऑक्टो .नोव्हे- 2019, पृ .07

3 काळबांडे ए.एम ., भारताचा इतिहास, प्रशांत पब्लीकेशन, जळगांव, प्रथम आवृत्ती 2019, पृ .133

4 पांडे सुरेशकुमार उपकार प्रकाशन आग्रा -:, पृ .295

5 कित्ता पृ .290

6 शुक्ल रामलखन (संपा)2016, आधुनिक भारत का इतिहास, हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय, दिल्ली, पृ .652

7 विद्याधर महाजन, उपरोक्त पृ .604

8 प्रतिभा जौन, गांधीयन आयडियाज, सोशल मुव्हमेंट्स ॲण्ड क्रियटीव्हीटी, रावत पब्लिकेशन, जयपुर, 1985, पृ .150

9 पांडे सुरेशकुमार उपरोक्त पृ -:295

10 देशमुख प्रशांत इतिहास -:, विद्या भारती प्रकाशन लातुर, पृ .506

## ६८ वर्धा जिल्ह्यातील महात्मा गांधी प्रणीत अस्पृश्यता निवारण चळवळ

डॉ. प्रियराज महेशकर

1 चौधरी, कि का ;१९९२महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, वर्धा जिल्हा : पृ.७२ मुंबई:दार्शनिक विभाग, महाराष्ट्र शासन.

2 कित्ता ;पृ.७३

3 बैस,विरेंद्र ;२००५वर्धा जिल्हयातील स्वातंत्र आंदोलनाचा इतिहास ;पृ.१९० नागपूर :मंगेश प्रकाशन.

4 कित्ता ;पृ.१९०

5 कित्ता ;पृ.१९०

6 चौधरी, कि. का ;१९९२द्ण पुर्वोक्त ;पृ.८२

7 बैस,विरेंद्र ;२००५ पुर्वोक्त ;पृ.१९०

8 बैस,विरेंद्र ;२००५ ;पृ.१९०